**MHSO130010252007**

## निशाणी क्र. १४४ वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ यांचे नावासमोर मयत असे लिहुन दुरुस्ती करणेकामी परवानगी मिळणेकरीता दिला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.२ गिरजाबाई विश्वनाथ संपकाळ ही २९/०२/२०१६ रोजी मयत झालेली असुन त्यांचे वारस या दाव्यात प्रतिवादी म्हणुन अगोदरच सामील केलेले आहेत. परंतु प्रतिवादी क्र.२ हिचे नाव कमी करण्याचे अनावधानाने राहुन गेले आहे. त्यामुळे दाव्यात प्रतिवादी क्र.२ हिचे नावापुढे मयत असे लिहुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे. म्हणुन अर्ज मंजुर होण्याची विनंती केली. सदर अर्जास प्रतिवादींनी हरकत घेऊन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०२.** अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीस ऐकले. वादीने सदरचा दावा हा घोषणेसाठी व निरंतर मनाई करता दाखल केला आहे. वादीने सदर प्रतिवादी नं.२ यांच्या नावापुढे मयत असे लिहुन दुरुस्ती करण्याची परवानगी मागितलेली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच सदर दुरुस्ती केल्यामुळे कोणत्याही पक्षाचे नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी क्र.१४४ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.१४४ मंजूर करण्यात येतो, वादीला असे सुचित करण्यात येते की त्यांनी ०७ दिवसांत आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANTOSH BHOLARAM VIJAYKAR
Date: 2024.07.25 16:53:59 +0530

बार्शी
दिनांक २५/०७/२०२४.

(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Shri.S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 25/07/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 25/07/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 25/07/2024 |